Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal
Online Available at www.cmrj.in
ISSN No.2456-1665

# नेतृत्व: निर्मितीचे घटक

**प्रा. डॉ. अंकुशराव अंबादास चव्हाण**
विभाग प्रमुख तथा संशोधक मार्गदर्शक
राज्यशास्त्र विभाग
मत्स्योदरी कला महाविद्‍यालय तीर्थपुरी
मो.नं. ९५५२३८७२६६

एखादी व्यक्ती जेव्हा नेता म्हणून पुढे येते तेंव्हा त्याची पुढाकार घेण्याची शैली तिच्या नेतृत्व साकार होण्याच्या विशेष परिस्थितीत दिसून येते कि, ज्या परीस्थित पुढारी म्हणून कार्य करते. तसेच तिच्या व्याक्तीमात्वाच्या गुणावरच नव्हे तर तिच्या अनुयायाच्या गुणवैशिष्ट्यावर देखील तिची नेतृत्व शैली अवलंबून असते. समूहाची रचना, स्वरूप, उद्दिष्टे व घटकांच्या सामान्य क्रिया याचा नेतृत्वावर प्रभाव पडतो. समूहात नेतृत्वाची मध्यवर्ती व महत्वपूर्ण भूमिका असल्यामुळे नेतृत्वाची बुद्धी तथा प्रतिभा, शारीरिक सुदृढता, आत्मविश्वास, प्रभुत्वाची लालसा, वक्तृत्व व वाक्चातुर्य, आत्मसंयम, चारित्र्य, उत्साह, साहस, गतिशीलता आणि त्यांच्याकडे असलेली संघटन कुशलता, मानवीयता, भविष्याचे वेध इत्यादी नेतृत्वाच्या जडण घडणीचे आयाम असल्याचे दिसते.

आज नेतृत्व हि संकल्पना आपल्या भिन्नभिन्न आयामसह नवनव्या रूपाने दृष्टिगोचर होत असली तरी ती प्राचीन काळापासून सर्वज्ञात आहे. अगदी सर्वप्रथम वेद वाडमयात तिचा स्पष्ट उल्लेख आढळतो युद्ध काळात शत्रूवर मात करण्यासाठी समर्थ युद्ध नेत्याच्या स्वरुपात नेतृत्वाची आवशकता वाटू लागली. युद्ध कलेतील नैपुण्य महत्वाचा गुण मानला जात असे. कालांतराने युद्ध नेत्याचे रुपांतर राजनेत्यामध्ये झाले व त्याची निवड आपसात विचार विनिमय करून होऊ लागली.

नेतृत्व हि सामुहिक स्वरुपाची संकल्पना असून ती व्यक्तीच्या सामान्य हितसंबंधावर आधारित असते नेतृत्व स्वतःमधेच एक प्रक्रिया असून ती व्यापक अशा राजकीय प्रक्रीयाचा एक महत्वपूर्ण भाग होय. यामध्ये पुढारी, अनुयायी विशिष्ट परीस्थिती, संसूचन व समूहाची उद्दिष्टे हे महत्वाचे घटक आहेत. नेतृत्वाचा अभ्यास हा भिन्न दृष्टीकोनातून केला जातो त्यामध्ये गुण दृष्टीकोन, गट दृष्टीकोन, परीस्थिती दृष्टीकोन व शक्ती प्रक्रिया दृष्टीकोन अधिक महत्वपूर्ण आहेत. लोकशाही शासनात लोकांच्या वाढत्या राजकीय सहभागाबरोबर नेतृत्वाचा अधिक निरोगी व स्वस्थ पद्धतीने विकास होत असतो. अधीकाधिक लोकांचा पाठींबा मिळावा अशी नेतृत्वाची भूमिका असते व त्या दृष्टीने कार्यचे आयोजन केले जाते. नेतृत्वाच्या अध्ययनात पुढारयाच्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास महत्वपूर्ण

ठरला आहे. कारण प्रत्येकाच्या व्यक्तिमत्वाची जडणघडन भिन्न असते. राजकीय घटकावर व्यक्तिमत्वाचा प्रभाव पडतो. हे उघड सत्य आहे. तसेच नेतृत्वाच्या भिन्न्तेचे कारण त्याचे सामाजिक स्त्रोत भिन्न असतात. त्यामुळे नेतृत्वाच्या विश्लेषणासाठी त्याचे स्त्रोत तपासून पाहणे अधिक योग्य आहे. यामध्ये कुटुंब, शाळा, कॉलेज, आत्मसंमानाची भावना तथा देशभक्ती इत्यादी उगमस्थानाचा विचार केला आहे. तर नेतृत्व हि सतत चालणारी प्रक्रिया असल्यामुळे तिचे सातत्य कायम राहण्यासाठी नेतृत्वात कशापद्धतीने समावेशन केले म्हणजे भरती होते त्यासाठी औपचारिक आणि अनौपचारिक पद्धतीचा विचार करण्यात येतो.

आपण असे म्हणतो कि, अमुक नेतृत्व चांगले किवा अमुक नेतृत्व ठीक नाही म्हणजे नेतृत्वात भिन्न प्रकार असतात. उदा.विवेकी नेतृत्व हे बुद्धीमत्तेचा व नैतिकतेचा उच्चपातळीवर नेतृत्व आहे. तर सुधारणेच्या आधारावर सुधारणावादी नेतृत्व अस्तित्वात येते. पिढीत लोकांबद्दल असलेल्या सहानुभूतीमुळे या नेतृत्वाचा विकास होतो. असे असले तरी नेतृत्व काही नव्याने निर्माण झाले असे नाही. ते प्राचीन काळापासून भिन्न देशात विकसित झाले आहे. मात्र,विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात त्यामध्ये झपाट्याने बदल झाले असल्याचे दिसून येते. प्रत्येक देशातील परिवर्तन भिन्न स्वरूपाचे आहे. औद्योगिक क्रांतीला लोकशाहीची जोड मिळाल्याने व वैचारिक पृथक थेमुळे हे स्वरूप भिन्न आहे. कुठे मध्यमवर्गाची राजकारणात वाढ झाली तर काही ठिकाणी कृषिप्रधान नेतृत्व वाढले आहे. काही देशात कारखानदार वर्गाचा नेतृत्वावर प्रभाव पडला आहे. आज तर बहुराष्ट्रीय कंपन्यांचा प्रभाव वाढत आहे.

नेतृत्वाचा लिखित स्वरूपाचा स्पष्ट उल्लेख वेदात आढळतो. वेद हे जगातील आदि अक्षरवाड्मय होय. वेद काळी राज संस्था सुव्यवस्थित स्वरुपात होती. यासंबंधी असंख्य उल्लेख आढळतात. रामायणात उल्लेख आढळतात. रामायणात कैकइचा कावा व महाभारतातील दुर्योधनाचा दुराग्रह हि नेतृत्व संघर्षाची स्पष्ट उदाहरणे आहेत. महाभारताच्या शांती पर्वात राज्ययंत्रणेचे महत्व प्रतिपादन करून राजनीती विशारद भीष्माचार्यांनी असे म्हटले आहे कि, राजधर्म हत्तीच्या पायाप्रमाणे समावेशक असतो. बौद्ध संघराज्याचा उल्लेख मझ्झीम निकाय/त्रीपिटक बुद्ध जातक कथा, दधी निकाय या ग्रंथात आढळून येतो. प्राचीन काळात गणराज्य नेतृत्वाबरोबर स्थानिक पातळीवर(नगर व ग्रामपातळीवर) नेतृत्वाचा विकास झाल्याचे दिसून येते. स्वयंशाश णाची पद्धती, नगरपासून तर खेड्यापर्यंत दृढमल झाली होती. मध्ययुगात मतपेटीतून निवडलेल्या प्रतिनिधीला पुढारी म्हणावे कि, आपल्या नेतृत्व गुणामुळे लोकमान्यता प्राप्त होणारया पुढार्याला नेता म्हणावे हा वादाचा मुद्दा असला तरी पैतृक वारसाच्या आधारावर राजपद प्राप्त करणाऱ्याला राजकीय पुढारी निश्चितच म्हणता येणार नाही. अगदी मौर्य साम्राज्याचा निर्माता चंन्द्रगुप्तापासून तर तात्या टोपे पर्यंत निर्माण झालेले अनेक राजपुरुष अनुवांशिक पद्धतीने राजनेते बनले नाहीत, हे मात्र खरे आहे. भारताच्या प्रदीर्घ इतिहासात

अनुवांशिक राजतंत्राबरोबरच सत्येच्या पराक्रमाने राजवंश निर्माण करणाऱ्या असंख्य राजनेत्याची उदाहरणे आहेत. तसेच ग्रीक व रोमन या प्राचीन संस्कृती म्हणून ओळखल्या जातात. त्यामध्ये अथेन्स, स्पार्टा सारखी नगरराज्ये होती. हि गणराज्य असून शासनाचा कारभार चालविण्यासाठी लोकपुढार्यांची निवड करीत. नेतृत्वासाठी वक्तृत्व हा आवश्यक गुण मानल्या जात असे. आधुनिक युगात ब्रिटीशांच्या आगमनानंतर वेगळी राज्य पद्धती नवे शिक्षण, वाहतुकीची नवीन साधने तसेच नवीन अर्थव्यवहार यामुळे भारताचे सामाजिक व राजकीय जीवन ढवळून निगाले. यामधून समाजाच्या विकासाबरोबर नेतृत्वाचाही विकास झाला. कारण नेतृत्व हे समाजाचेच विशेष अंग आहे. समाजाच्या अंतर्गत नेतृत्व एक स्वाभाविक रचना असल्यामुळे समाजाचे स्वरूप जसे जसे बदलत गेले तसे तसे नेतृत्वातहि परिवर्तन झाले आहे. आज नेतृत्वाचे स्वरूप प्रायोजीकतेचे असून नेतृत्वाचे उद्दिष्टे नैतिक आहेत. त्यात मानवी हिताची निश्चिती आहे. इतकेच नव्हे तर नेतृत्व हे स्वयंसिद्ध असल्यामुळे नेतृत्वाचे नेतृत्व हेच स्वतः उद्धिष्ट असल्याचे दिसते.

नेतृत्वाच्या व्याख्या:

(१) जेम्स म्याक ग्रागर बर्न्स: यांनी शक्ती या राज्यशास्त्रातील महत्वपूर्ण संकल्पनेचे प्रथम विवेचन केले आहे. त्यांचामते शक्ती दोन व्यक्तीच्या परस्पर संबंधावर अवलंबून असून ती दुतर्फी (bilateral) असते. उद्दिष्ट व स्त्रोत (objectives and resources) हे परस्परावलंबी आहेत. उद्दिष्टाशिवाय स्त्रोत नष्ट होतात. तर स्त्रोत नसल्यास उद्दिष्टे निरर्थक ठरतात. कोणत्याही एकाच्या अभावाने शक्ती नष्ट होते. त्यांच्या मते शक्ती व राजकारण जणू एकाच नाण्याचा दोन बाजू आहेत. आणि नेतृत्व व्यापक शक्ती प्रक्रियेचा एक भाग आहे.(१)

(२) लॉयड: नेतृत्व हि पुढारी बनण्याची व कायम राहण्याची कला नसून पुढाकार घेण्याची कला (art of leading) आहेत. ते हुकुमशाहीच्या अगदी विरोधी आहे. कारण हुकुमशाह आपल्या अनुयायीत्वाला विरोध करण्याच्या अधिकाराला मानीत नाही.(२)

(३) श्मीडने: नेतृत्व म्हणजे सामान्य हितसंबंधावर आधारित अशा व्यक्ती व समूहातील संबंध असून त्या पुढारी व्यक्ती च्या मार्गदर्शनाने ते निश्चित होतात. मराठी विश्वकोशामध्ये नेतृत्व म्हणजे पुढारीपण असा अर्थ सांगून समूहाच्या उद्दिष्टाची प्राप्ती करण्यासाठी अनुयायी म्हणवल्या जाणाऱ्या लोकांना एकात्मतेने वागण्यास उत्तेजन देणारी हि एक वागण्याची पद्धत आहे.(३)

(४) डॉ.ना.रा.खेकाळे: यांनी महाराष्ट्राच्या विधीमंडळीय नेतृत्वाचे अध्ययन अनुभावाश्रीत आधारावर केले आहे. संयुक्त महाराष्ट्र आंदोलन, भूमी सुधार, सहकारिता, पंचायती राज,इत्यादी हित संबंधीय क्षेत्राच्या अध्यायानातून असे निरीक्षणास आले आहे कि, "नेतृत्व हि स्वतः एक प्रक्रिया असून व्यक्त अशा राजकीय प्रक्रियेचा एक भाग आहे.

नेतृत्व जडण घडनेचे आयाम:

(१) आत्मविश्वास:

सामान्य व्यक्ती पेक्षा नेत्याला अधिक श्रम परिश्रम करावे लागतात. म्हणून त्याचे स्वास्थ उत्तम असणे आवश्यक आहे. तसेच त्याच्यामध्ये शारीरिक बळ सुद्धा भरपूर हवे. सभा, संमेलने, बैठकी, दीर्घकाळ चालणारे प्रवास, आंदोलने यामध्ये पुढार्याला फार धावपळ करावी लागते. खाणे-पिणे, विश्रांती, निद्रा या नितांत आवश्यक गरजा त्याला नियमितपणे प्राप्त होऊ शकत नाहीत. शारीरिक व्यक्तीमत्वात रंग रूपाचाही समावेश होतो. पुढारी एक प्रकारे अभिनेताच असतो. आपले शारीरिक सौष्ठव मनोहारी रंगरूप या द्वारे तो लोकांना आकर्षित करतो. टीवी सारख्या प्रसारमाध्यमातून आकर्षक व्यक्तीमत्वाद्वारे तर विशेष प्रभाव पडतो. उदा.जवाहरलाल नेहरू व इंदिरा गांधी यांना प्राप्त झालेल्या रंगरूप या घटकांचा प्रभाव लक्षणीय होता. रंग-रूपाबरोबरच चेहऱ्यावरील प्रसन्नता व स्मितहास्य हा देखील एक महत्वाचा गुण आहे. या सर्व गुणांनी युक्त पुढारी प्रथम दर्शनि लोकांचे मने जिंकून घेतात. (५)

(२) शारीरिक सदृढता:

व्यक्तीमत्वासाठी आत्मविश्वासाची नितांत आवश्यकता आहे. याच बळावर नेता समूहाचे नेतृत्व करू शकतो. त्यासाठी मनाची दृढता (integrity) आवश्यक आहे. आत्मविश्वासाशिवाय अनेक अडचणींच्या परिस्तिथी तो अनुयायीचे मार्गदर्शन करण्यास असफल होतो.बेलीग्रेथ तथा काऊले या विद्वानांनी प्रत्यक्ष सर्वेक्षणातून असा निष्कर्ष काढला कि, अनुयायीपेक्षा पुढार्यामध्ये आत्मविश्वास अधिक असतो. आत्मविश्वासामुळे बिकट परीस्थितीत कसा चमत्कार होतो याचे उत्तम उदा, म्हणजे इंग्लंड चर्चिल चे नेतृत्व होय.

(३) बुध्दी तथा प्रतिभा :

जर एखाद्या विशिष्टपरिस्थितीत,भावनावेशात येऊन पुढा-याने आपले बौध्दिक संतुलन गमाविले तर परिस्थितीवर तो मात करु शकत नाही. शिवाय अनुयायाचा त्याच्यावरील विश्वास नष्ट होतो.व नेतृत्वापासून तो वंचित होतो. सर्वसामान्य लोक विशिष्ट परिस्थितीत भावनादेशामुळे प्रतिसाद देतात त्यांच्या जवळ भविष्याकाळातील दूरदृष्टीचा अभाव असतो. परंतु पुढा-यांना भूत, वर्तमान व भविष्याकाळाचा परस्पर संबंध जोडून नियोजित कार्यक्रमानुसार मार्गदर्शन करण्यासाठीच आत्मसंबंध या गुणाची नितांत आवश्यकता आहे.

(४) आत्मसंयम तथा आत्मनियंत्रण:

सामान्य व्यक्तीपेक्षा पुढा-यामध्ये बुध्दीची मात्रा अधिक असते. कॅटलमॅनचे निष्कर्ष 1959 तथा स्टाईसच्या मते १९५३ च्या अध्यायनाचा निष्कर्ष अशाच प्रकारचा आहे. (६) बुध्दचे अनेक पैलू आहेत त्यामध्ये विज्ञान, कला, साहीत्य, वाणिज्य, यांत्रिकी, सामाजिक विज्ञान अश्या सर्व विषयाचे आकलन करून त्यामधील समस्याचे निराकरण

करुन समाजाचे मार्गदर्शन करण्याची प्रतिभा असावी लागते. अशी प्रतिभा अनुंवंशिक तथा उपजत असु शकते. तसेच ति शिक्षणातुन विकसीत होते. अशी ही प्रक्रिया बहुमुखी स्वरुपाची असावी लागते. कारण देशासमोर असणा-या प्रश्नांचे स्वरुप संक्रीर्ण व परस्परावर अवलंबूनअसते त्यात आर्थिक सामाजिक, धार्मिक, सैनिकी जातीयवांशिक, स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रिय, आंतरराष्ट्रीय असे भिन्न प्रश्न असतात. त्यांच्या आकलन होण्यासाठी उच्चकोटीची बुध्दीमत्ता, मौलिकता, अंतरदृष्टी आवश्यक आहे.

(५) वक्तृत्व व वाकचातुर्य:

श्रेष्ठत्वाची अभिलाशा नेत्याच्या व्यक्तीमत्वाचा अभिन्न असा भाग आहे. निरनिराळ्या क्षेत्रात श्रेष्ठत्व मिळविण्याच्या भिन्न पध्दती असतात जसे विद्येच्या क्षेत्रात निद्रानाश प्रभुत्व प्राप्त होते. तसेच क्रिडा, आर्थिक व्यवहार, सामाजिक परिस्थिती, राजकीय व्यवस्था या प्रत्येक क्षेत्रात श्रेष्ठत्वाच्या अभिलाषेमुळे नेते उदयाला येतात. ईतकेच काय पण 4-5 लोक जेव्हा वार्तालाप करतात त्यामध्ये देखील एखादा आपले प्रभुत्व प्रस्थापित करतो. म्हणुन असे म्हणता येईल की, सर्व नेते या प्रभावी व्यक्तीमत्व असलेल्या व्यक्ती असतात.

(६) प्रभुत्वाची लालसा व लक्षण:

नेत्यांना आपले विचार प्रभावीपणे लोकांच्या अंतरमनात उमटविण्यासाठी अमोघ वक्तृत्व हा व्यक्तीमत्वाचा एक महत्वाचा घटक आहे. वक्तृत्व ही उपजत देणगी मानली जाते. तसेच विशेष अभ्यासातून तिची प्राप्ती करने शक्य आहे. वक्तृत्वाच्या अनेक प्रभावी शैली आहेत. आपल्या विचाराची सुसंगत मांडणी करणे अनेक प्रकारची मनोवेधक विषय घेऊन सोप्याभाषेत मांडणे, भाषणाला उपमा, उत्प्रेक्षा इ. अंलकाराचा साज चढविणे.श्रोत्यांना भावणात्मक आवाहन करणे. चेह-यावरील भाव तसेच अभिनयाद्वारे श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणे.

अशा अनेक पध्दतीचा नेत्याद्वारे अवलंब केला जातो. स्वातंत्रविर सावरकर, अटलबिहारी वाजपेयी, बाळासाहेब ठाकरे, हे आपल्या वक्तृत्व शैलीसाठी प्रसिध्द आहेत. एकदा श्रिमती गांधी वाजपेयींना म्हणाल्या, आप आपणी भाषण शैलीसे लोगोपर प्रभाव डालते है। तर त्यांचे वाक्य संपताक्षणीच श्रीवाजपेची म्हणाले, आपभी तो आपणे सुंदर मुख़डे से लोगोपर प्रभाव जमाती है। या मध्ये वाकचातुर्य सोबतच चेह-याद्वारे व भाषणातील उतार चढाव याचा उपयोग करतात. याला भावउत्पादक वाकचातुर्य म्हणतात.

(७) उत्साह, प्रफुल्लता, साहस व गतिशीलता:

समाजाच्या नैतिक व सामाजिक रुढी/प्रथांचे पालन पुढा-यांने करावे अशी समाजाची अपेक्षा असते म्हणुन त्याचे चारिऱ्य उत्तम असावे.अनुयायी नेत्याचे अनुकरण करतात श्रेष्ठप्रतीचे चारिऱ्य असणा-या नेत्यांना समाजात मान व मान्याता प्राप्त होते. या उलट

सामाजिक व नैतिक मुल्यांची उपेक्षा करणा-याला नेतृत्वापासुन वंचित व्हावे लागते. याची उदाहरणे पुर्वी बघितली आहेतच. मनोवैधानिकदृष्टया

चारिञ्याचे दृढ चारिञ्य व दुर्बल चारिञ्य असे दोन प्रकार आहेत. एखाद्या परिस्थितीत अथवा वातावरणात दुर्बल चारिञ्याची व्यक्ती पुढारी बनली तरी अधिक काळापर्यत ती नेतृत्व करु शकत नाही. चारिञ्यामध्ये अनेक नैतिक व सामाजिक मुल्यांचा समावेश होतो. जसे ईमानदारी, सदभावना, न्यायभावना, विश्वास, उच्चआचरण, दृढता, धोरणात्मक आदर्शवाद, चारिञीक शक्तीचे प्रगटन इ होय.

८) चारिञ्य :

कल्पनाशक्ती, प्रेरणा व निश्चय, मानसिक लवचिकता या गुणाद्वारे मानसिक व्यक्तीमत्व प्रकट होते. मनोवैधानीकाच्या मते या मनाच्या अवस्था आहेत. एखादी व्यक्ती एखाद्या प्रसंगी अधिक उत्साही,साहसी व प्रेरणादायाक असते. पंरतु नेत्यांच्या बाबतीत वरील प्रकारच्या अवस्था जितक्या अधिक प्रमाणात असतात. तितक्या अधिक प्रमाणात त्यांचे व्यक्तीमत्व प्रभावी व प्रेरणादायक असते. यातुन नेत्यासंबंधी विश्वास निर्माण होतो.अनुयायांन गती प्राप्त होते.उत्साहामुळे निरनिराळे कार्य करण्याची चिकाटी पुढा-यामध्ये निर्माण होते. तर प्रफुल्लतेमुळे अनुयांयाना आपलेसे करण्याची हातोटी पुढा-यामध्ये असते. साहस व निर्भयपणामुळे धोका पत्करण्याची तयारी पुढा-याची असते.

(९) सामाजिकता तथा मानवियता:

नेत्याच्या व्यक्तीमत्वासाठी हा नितांत आवश्यक गुण आहे. किंबहुणा सामान्य व्यक्तीपेक्षा या गुणामुळेच नेते अद्वितीय ठरतात. माञ त्यासाठी सामाजिक जबाबदारीची जाणीव हवी. सामान्य हितसंबध तथा उद्बिष्ठाच्या लोकापासुन तर भिन्न भिन्न हित संबधाच्या मानव समुहांना एकञ आणण्यासाठी नेत्यामध्ये विलक्षण मानसिक लवचिकता आवश्यक असते. संघटनेसाठी अनुयांयाना हा नेता आपला आहे, असे वाटणे व त्यासाठी अनुयांयामध्ये भावनात्मक एक्य वाढविणे ही महत्वाची गरज असते. संघटण कौशल्य केवळ अनुवंशिक म्हणता येणार नाही ते शिक्षणातूनही निर्माण होऊ शकत नाही. विशिष्ट संस्कारातून ह्या गुणांची वाढ होउ शकते. जगातील सर्व महान नेत्यापासुन तर साधारण पुढा-यापर्यंत संघटन कुशलता तथा संचालन क्षमता आढळुन येते. संघटनेसाठी लोकांच्या जीव्हाळ्याचे प्रश्न लोकासमोर मांडुन त्यांच्या भावनेला आवाहन केले जाते. व त्याचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न केला जातो. स्वतंञ पुर्व काळात देशाचे स्वातंञ हा सर्वात महत्वाचा मुद्दा भारतीया नेतृत्वापुढे होता. स्वातंञ्यानंतर निरनिराळया राजकीय पक्षांच्या नेत्यांना आर्थिक, सामाजिक, धार्मिक तथा जातिच्या आधारावर राजकीय पक्ष, संघटना निर्माण केल्यात. ज्या पुढा-यांचे संघटन कौशल्य अधिक त्या पक्षांना व्यापक जनमत प्राप्त होते.

Online Available at www.cmrj.in
ISSN No.2456-1665

(१०) संघटन, कुशलता व कार्यकारी क्षमता:

सामाजिकतेचा अर्थ समाजाभिमुखता, सामान्य व्यक्ती साधारणत: आत्मनिष्ठ तथा व्यक्तीनिष्ठ असतात. परंतु पुढा-यांमध्ये सामाजिक परिस्थिती व समस्या जाणुन घेताना सामाजिक उत्तेजनेबद्दल अधिक जागृती तथा संवेदनशिलता असते. तसेच मानवियतेमुळे ही भावना अधिक तीव्र होते. समाजासाठी काहीतरी करण्याच्या तीव्र भावनेलाच सामाजिक कार्यशिलता म्हणतात

अशा प्रकारे एखादी व्यक्ती जेव्हा नेता म्हणुन पुढे येते तेव्हा त्याची पुढाकार घेण्याची शैली तिच्या नेतृत्व साकार होण्याच्या विशेष परिस्थितीत दिसुन येते की, ज्या परिस्थितीत ती पुढारी म्हणुन कार्य करते तसेच तिच्या व्यक्तीमत्वाच्या गुणावरच नव्हे तर तिच्या अनुयांयाच्या गुणवैशिष्ट्यावर देखील तिचे नेतृत्वशैली अवंलबुन असते. समुहाची रचना, स्वरुप, उद्दिष्टये व घटकांच्या सामान्य क्रिया याचा नेतृत्वावर प्रभाव पडतो. समुहात नेतृत्वाची मध्यवर्ती व महत्वपुर्ण भुमिका असल्यामुळे नेतृत्वाची बुध्दी तथा प्रतिभा, शारिरीक सद्दढता, आत्मविश्वास, प्रभुत्वाची लालसा, वक्तृत्व व वाकचातुर्य, आत्मसंयम, चारिञ्य, उत्साह, साहस, गतिशिलता, आणि त्यांच्याकडे असलेली संघटन कुशलता, मानवियता, भविष्याचे वेध इ. नेतृत्वाच्या जडण-घडणीचे आयाम असल्याचे दिसते.

**संदर्भ**:

(1) मराठी विश्वकोश, खंड, ८ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, पुणे, पृ.कृ.७८१

२) Lord Lioyd of Dolobraim : "Leadership in Democrocy "oxford university Press London 1939.

(3) James Mack Gregor Burns, Leadership, Ambica Publications New Delhi 1978 P. No. 18.

(4) Dr. N.R. Khekale, A study of Legislative Leadership in Maharashtra a unpublished thesis, submitted to Nagpur University for Ph.D thesis in 1982 P.No. 22

(5) जनार्धन ठाकूर, हे नेते जनतेचे, उत्कर्ष प्रकाशन पुणे, १९७८ पृ. क्र १५२

(६) David L. Sills (ed) International Encyclopedia of the social Sciences Vol.g (New York) The Macmillon co. and The Free Press 1972 P.N. 97C

(7) डॉ.ना.रा. खेकले, राजकीय नेतृत्व, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर प्रथम आवृत्ती, १९९९.